वाचले:-१) श्री लक्ष्मण फकीरा नमायते रा.अटवाडे ता.रावेर यांचा दिनांक नसलेला३/४/२००३ चा अर्ज.

२) तहसिलदार रावेर यांचा अहवाल क्र.जमीन/२००५/१२६२/२१८ दि.८/२/२००५

३) म.वरीष्ठ भूवैज्ञानिक,भूजल सर्वेक्षण विभाग जळगांव यांचे पत्र क्र.भुवैसा/भुसवि/सर्व्हेअर/३७६/२००४ दिनांक २१/४/२००४.

४) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनीयम १९६६ चे कलम ३८ व शासन परीपत्रक जमीन-३२९५/२/प्र.क्र.१६०/ज६ दिनांक २०/६/९६.

५) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५१(१)(अ).

---ooooooo---

**आदेश**

क्र.जमीन/३/२८/~~प्रकार~~ फुलवि ५४०
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय
जळगांव दिनांक ५ /४/२००५

श्री लक्ष्मण फकीरा नमायते रा.अटवाडे ता.रावेर यांनी मौ.अटवाडे ता.रावेर येथील त्यांचे मालकीचे शेत ग.नं.१६५ व १६८ मधे पाणी नेणे कामी मौजे ~~अटवाडे ता.रावेर येथील ग.नं.१ पैकी या~~ ग्रामपंचायत निहीत ~~जागे पैकी हे.०.०१ आर जागा विहीर खोदणेसाठी मिळावी म्हणून विनंती अर्ज~~ केलेला आहे.

प्रस्तूत कामी तहसिलदार रावेर यांनी सविस्तर चौकशी केलेली असून मागणी जागेचे आसपास कोणतीही सार्वजनिक अथवा खाजगी पाण्याची विहीर नसले बाबत कळविले असून जागा वितरणास शिफारस केलेली आहे.ग्रामपंचायत अटवाडे यांनी जागा वितरणाकामी नाहकरकत ठराव केलेला आहे.म.वरीष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण जळगांव यांनी सदरची जागा विहीर खोदणेस योग्य असले बाबत कळविले आहे.उपविभागीय अभियंता,पाटबंधारे उपविभाग सावदा यांनी जागा वितरणास नाहरकत दाखला दिलेला आहे.गांवी अर्जदार यांना जागा वितरणास कोणाचीही हरकत नसले बाबत तहसिलदार यांनी कळविले आहे.ग्रामपंचायतीने जागा वितरणास नाहरकत ठराव दिलेला आहे.

अर्जदार श्री नमायते यांनी त्यांना कळविले प्रमाणे रू.९४/- प्रतिवर्ष भाडेपटटा अधिक लोकलफंड यादराने प्रथम दोन वर्षाचा भाडेपटटा शासनास भरणा करून चलनाची प्रत सादर केलेली आहे.

उपरोक्त परीस्थितीत मी,जिल्हाधिकारी,जळगांव,मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ५१(१)(अ) अन्वये मौ.अटवाडे येथील ग्रा.पं.निहीत गट नं.१ पैकी स्थळदर्शक नकाशात दर्शविले प्रमाणे हे.०.०१ आर जागा ग्रा.पं.कडून काढून शासनाकडेस निहीत करीत आहे.तसेच महाराष्ट्र जमीन महसूल अधिनीयम १९६६ चे कलम ३८ व शासन परीपत्रक क्र.३२९५/२/प्र.क्र.१६०/ज ६ दिनांक २०/९/९६ अन्वये मला प्राप्त आसलेल्या अधिकाराचा वापर करून, श्री लक्ष्मण फकीरा नमायेते यांना मौजे अटवाडे ता.रावेर गट नं.१ पैकी हे.०.०१ आर जागा प्रतिवर्ष ९४/- रू.अधिक नियमानूसार उपकर(लोकलफंड) या दराने ५ वर्षाकरीता भाडेपटटयाने खालील अटी व शर्तीवर बंधनकारक ठेवून वितरीत करीत आहे.

**अटी:-**

१) जागेचा वापर विहीरीसाठीच करावा.
२) मंजूर केलेल्या जागेपेक्षा जास्त जागेचा वापर करून नये.
३) अर्जदारास विहीत नमून्यात करारनामा करून दयावा लागेल.
४) जागेचे नूतनीकरण करावायाचे झाल्यास मूदत संपणे पूर्वी किमान ३ महिने अगोदर अर्ज करावा लागेल.
५) मूदत संपले नंतर जागा पूर्ववत करून दयावी लागेल.
६) तहसिलदार रावेर उर्वरीत ३ वर्षाचा भाडेपटटा नियमीत वसूल करावा.
७) लगत शेतमालकाचे जतिनीतून पाईपलाईन टाकणे कामी तहसिलदार यांचे कडून स्वतंत्रपणे परवानगी घेणे आवश्यक आहे.
८) भाडेपटटयाने दिलेल्या जागेची शासनास आवश्यकता पडल्यास ती जागा केलेल्या बांधकामाबदद्ल व खर्चाबदद्ल कोणतीही भरपाई न देता १ महिनेपूर्वी नोटीस देवून सरकार जमा करण्याचा जिल्हाधिकारी यांना अधिकार असेल.
९) गावी टंचाई काळात गावास विनामोबदला १ दिवसाआड पाणी पुरवठा करावा लागेल.

C:\Pvb\PVB\well.doc

९) वरीलपैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास सदरची जागा सरकार जमा करण्यात येईल.

( प्रकाश सालदे )
जिल्हाधिकारी,जळगांव

प्रत:- श्री.लक्ष्मण फकीरा जमादार रा.अटवाडे ता.रावेर
प्रत:- तहसिलदार रावेर
२/- आदेशाप्रमाणे कार्यवाही करावी.अर्जदारचे नांव ७/१२ ला इतर हक्कात लावावे.उतारा व नोंद सादर करावी.सोबत संचिका
प्रत:- तलाठी अटवाडे ता.रावेर

जिल्हाधिकारी,जळगांव करीता

C:\Pvb\PVB\well.doc

8.43

Read:- Govt. Rev. and Forests Deptt. Memorandum No. LFD-3278/31787-G-8 D/16-9-78.

No. LND.III. CR 487/2740
Office of the Collr.
Jalgaon 10-11-78

for approval.

Order

उ/41

In exercise of the powers vested in ~~him~~ him under sec. 51(1A) of the Bombay Village Panchayat Act 1958, delegated under Govt. notification No. VPA 1270/531338-N Dated 8-12-70, the Collector of Jalgaon is hereby pleased to resume an area measuring 55.74 sq. metres (30x30 = 600 sq. ft) out of S.No. 76/1 of Village Kasjor, Taluka Raver and further orders to transfer it in favour of the Post and Telegraph Department of Govt. of India for Construction of Unattended repeaters huts for Co-axial Cable Project on payment of occupancy price of Rs 250/- (Two hundred fifty only) subject to the following Conditions:-

1) that the transferee shall execute a transfer deed in the form appended to the Govt. Rev. Deptt. Circular no. LFD 2362/75604-B D/9-10-63.

2) that in case the land is dis[illegible] [illegible] by the [illegible]

it shall be liable to assessment in accordance with the provisions of the M.L.R. Code 1966 and rules made thereunder; and

3) that in case of relinquishment of land by the Govt. of India, the Govt. of State shall have a right to assume the land on such terms and conditions as may be agreed upon by both the Govts.

OC

Collr. Jalgaon.

2/11/78

To

The Divisional Engineer, Telegraphs, Coaxial Installation Div., Goregaon, Nagpur-10 with ref. to his letter no. W-24/Land Acqn./16 dt. 8.3.77

2/. He is requested please to arrange the payment of occupancy price to the Tah. Raver and to execute a transfer deed in the prescribed form before the Tahasildar Raver Dist. Jalgaon.

Copy w.c.s. to the Sarpanch, V.P. Karjod Tal. Raver for infn.

Copy w.c.s. to the SDO, [illegible], Jalgaon for infn.

Copy to the DILR Jalgaon for information & further n/a.

Copy with the case papers fd to the Tahasildar for further necessary action.

Possession of the land transferred [illegible]

and [illegible]

वाचले :- १) जिल्हा समाज कल्याण अधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्र.जिसकअज/शावगृ/ शास.जमीन//शावगृरा/९८/३३८०/दिनांक १७/१२/१९९८.
२) तहसीलदार रावेर यांचे पत्रव्यवहार पत्र क्र.जमीन/१/२००१/कावि/४३४/२००१ दिनांक १४/०५/२००१
३) सहाय्यक संचालक नगर रचना जळगांव यांचे कडील पत्र क्र.जागा मागणी/ रावेर/ग.नं.४८३/१/ससजळ/१८३३ दिनांक १९/जुलै/२००१
४) कार्यकारी अभियंता सा.बा.(उत्तर विभाग) जळगांव यांचे पत्र क्र. सिबीएम/१३८८/०२ दि. ४/४/२००२
५) शासन परीपत्रक क्र. एलएनडी. १०७१/१८३७३६/ए-२ दिनांक ९/९/७१.

----- ००० -----

क्र.जमीन/२/२६/संजामा/एसआर/७१ २००१
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, जळगांव
दिनांक ११/०४/२००२

**आदेश :-**

जिल्हा समाज कल्याण अधिकारी जळगांव यांनी रावेर येथे मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह बांधणेकामी रावेर गट नं.४८३/१ पैकी ०हे.६० आर जागा मिळणे बाबत विनंती केली आहे

उपोदघातातील अनुक्रमांक (२) नुसार तहसीलदार रावेर यांनी चौकशी अंती उपरोक्त मागणी केलेली जागा वितरणास शिफारस केली आहे.व
उपोदघातातील अनुक्रमांक (३)नुसार सहाय्यक संचालक नगर रचना जळगांव यांनी व अनुक्रमांक (४) नुसार कार्यकारी अभियंता सा.बा.(उत्तर विभाग) जळगांव यांनी उपरोक्त मागणी केलेली जागा वितरणास शिफारस केली आहे.

त्यावरून मी,जिल्हाधिकारी जळगांव या आदेशाद्वारे रावेर येथील ग.नं. ४८३/१ पैकी ०हे. ६० आर क्षेत्र मी जागा उपोदघातातील अनुक्रमांक (५) नुसार प्रदान केलेल्या अधिकारचा वापर करून मागासवर्गीय मुलांचे शासकिय वसतीगृहासाठी जिल्हा समाज कल्याण अधिकारी जळगांव यांचे नांवे खालील शर्तीस आधिन राहून वर्ग करीत आहे.

**<u>अटी / शर्ती</u>**

१) जागा ज्याप्रयोजनासाठी वर्ग करण्यांत आली आहे त्याच प्रयोजनासाठी जागेचा उपयोग करावा
२) सदर वर्ग करण्यांत आलेल्या जागेचे कोणत्याही प्रकारचे हस्तांतरण, व उपयोगात बदल जिल्हाधिकारी यांचे पूर्व परवानगी शिवाय करता येणार नाही
३) सदर वर्ग करण्यांत आलेल्या जागेवर वसतीगृहाचे बांधकाम या आदेशाच्या तारखेपासून दोन वर्षाचे आंत पूर्ण करावे.
४) संबधीत खात्यास उक्त वर्ग केलेल्या जागेची आवश्यकता नसल्यास जागा केव्हाही वर्ग करण्यांत येईल
५) बांधकाम नकाशास संबधित न.पा./ग्रा.पं.यांची पूर्व मजूरी घेण्यांत यावी व मंजूरीनुसारच बांधकाम करावे
६) उक्त जागेचा उपभोग उक्त मंजूर प्रयोजनासाठी उक्त संस्थेने न घेतल्यास व शासनास आवश्यकता भासल्यास उक्त जागा सरकार जमा करणचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.

७) उक्त शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास अगर तसे आढळून आल्यास उक्त जागा कोणतीही पूर्व सुचना न देता सरकार जमा करण्यात येईल व त्या प्रित्यर्थ कोणतीही नुकसान भरपाई मागण्याचा हक्क राहणार नाही

८) जागेत वसतीगृहाचे बांधकाम करणेपूर्वी बांधकाम नियंत्रण रेषेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्याक राहील.

(डॉ. संजय मुखर्जी )
जिल्हाधिकारी जळगांव

प्रत :-जिल्हा समाज कल्याण अधिकारी जळगांव
प्रत :-तहसीलदार रावेर यांना मुळ चौकशी संचिकेसह
प्रत :-तालुका निरीक्षक भूमीअभिलेख रावेर
प्रत :- अधिक्षक भूमी अभिलेख जळगांव
प्रत :- कायर्कारी अभियंता सा.बा. (उत्तर विभाग) जळगांव
प्रत :- सहाय्यक संचालक नगर रचना जळगांव
२/- आवशक त्या कार्यवाहीसाठी व माहीतीसाठी रेवाना

जिल्हाधिकारी जळगांव करीता

वाचले :- १) या कार्यालयाचे आदेश क्र.जमीन/३/२८९९/कावि/१५२४ दि.१२/७/९९.
२) मे.कैलाशचंद्र ॲन्ड कंपनी धूळे यांचा दि.३०/६/२००० चा अर्ज.
३) तहसिलदार रावेर यांचे पत्र क्र.जमीन/१/२०००/कावि/७३७ दि.७/७/२०००.
४) सहा.संचालक नगर रचना,जळगांव यांचे पत्र क्र.मूल्यानिर्धारण/ससंजळ/२९०२ दिनांक ८/१२/२०००.
५) म.ज.म.(सरकारी जमीनीची विल्हेवाट) नियम १९७१ चे नियम ३५(२).

-------------०००००० -------------

क्र.जमीन/३/२८/कावि/४७१३
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय
जळगांव दि. ८/२/२००१

**आदेश**

या कार्यालयाचे आदेश क्र.जमीन/३/२८९९/कावि/१५२४ दिनांक १२/७/९९ अन्वये मौजे रावेर ता.रावेर गट नं.६०३ पेकी ०.२० आर जागा मे.कैलाशचंद्र ॲन्ड कंपनी धूळे यांना स्टोनक्रशरसाठी १ वर्ष मुदतीने भाडेपटटयाने वितरीत करण्यात आलेली होती.जागेची १ वर्ष मुदत वाढ मिळणे कामी अर्जदार यांनी अर्ज केलेला आहे.तसेच गट नं.६०३ पेकी फक्त हे.०.०५ आर जागेचीची आवश्यकता असलेने ०.०५ आर जागेचीच मुदतवाढ मिळणे कामी विनंती केलेली आहे.

प्रस्तूत कामी तहसिलदार रावेर यांनी सविस्तर चौकशी केलेली असून,जागेची मुदतवाढ देणेस शिफारस केलेली आहे.सहा.संचालक नगर रचना,जळगांव यांनी कळविलेल्या मूल्यांकना प्रमाणे ०.०५ आर जागेचा भाडेपटटादर रू. १४५२/- मात्र येतो. उपरोक्त परस्थितीत मी,जिल्हाधिकारी,जळगांव मला प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करून मौजे रावेर ता.रावेर गट नं.६०३ पेकी हे.०.०५ आर जागा मे.कैलाशचंद्र ॲन्ड कंपनी धूळे यांना स्टोन क्रशरसाठी प्रतिवर्ष रू.१४५२/- अधिक नियमानूसार लोकल फंड या दराने खालील अटी व शर्तीवर बंधनकारक ठेवून मूदत वाढ देत आहे.

अटी
१) या कार्यालयाचे दिनांक १२/७/९९ मधील अटी बंधनकारक रहातील.
२) जागेची मुदतवाढ दिनांक ११/७/२००० पासून पूढे १ वर्ष राहील
३) अर्जदार यांचे नावं ७/१२ उता-यावर फक्त हे.०.०५ आर जागेकरीता इतर हक्कात समाविष्ट करावे.
४) जागेचा भाडेपटटा प्रथम वसूल करण्यात यावा.

संजीवकूमार
जिल्हाधिकारी,जळगांव

प्रत:- मे.कैलाशचंद्र ॲन्ड कंपनी धूळे
प्रत:- तहसिलदार रावेर
२/- अर्जदार यांचे ताब्यातून पूर्वी वितरीत केलेल्या जागेपैकी ०.०१५ आर जागा काढून घ्यावा व आदेशा प्रमाणे कार्यवाही करावी.
प्रत:- तलाठी रावेर ता.रावेर.

जिल्हाधिकारी,जळगांव करीता

As on over-leaf.

for Approval.

Read:- Govt. Rev. and For. Deptt. memorandum No. LMN 3278/(49622)/CR-1162-G6 Dt 7-4-79

No. LND-IV-RR-1601-CR-31
Office of the Collr.
Jalgaon 30-5-79.

Order

1361
15-5

The land comprised in S.No. 186 of Raver admeasuring 1H. 27R. was lease out first to the Mun. Council, Raver on payment of annual rent of Re 1/- under this office order No. LND-F-WB 3374 d 4-12-61 for a period of three years. This lease period afterwards was extended by seven years till the end of 1970-71 under this office order No. LND-III-WB 2277 d 11-10-71. The M.C. Raver requested on 30-11-71 to grant the land in perpetuity. The original case papers were referred to Govt. for soliciting orders. Govt. in Rev. and Forests Deptt. under their memorandum quoted above have conveyed their sanction under rule

35(2) of the M.L.R. (Disposal of Govt. Lands) Rules 1971, to the extension of lease period W.E.F. 1-1-72 to 15 years ending 31-12-1987.

In view of the above facts, the Collr. of Jalgaon is hereby pleased to extend the lease period W.E.F. 1-1-72 to 31-12-87 i.e. for 15 years on payment of a nominal lease rent of Re 1/- per annum of the land ~~ad~~ admeasuring (1H. 2) R. out of S.No. 186 of Raver in favour of the Mun. Council Raver for the purpose of Compost pits on the following Conditions :-

i) That the M.C. Raver shall use the land for the purpose of Compost pits only.

ii) That the grantee shall pay the rent to Govt. yearly in advance.

iii) that the ~~land~~ grantee shall vacate the land at any time if required by Govt.

iv) that the grantee shall pay the amt. of N.A.A. at the existing rate at the village and at the revised rate as may be fixed from time to

line;



v) that the distance of 50' ... from Rani - Burhanpur Road side should be left out to avoid closure of distance of the dry composting of refuse from the side road in question and the remaining portion of side along ~~with~~ the existing night soil trenching that is away from the road should be used for the dry composting of refuse;

vi) that the grantee shall execute an agreement in form no. II attached to the ~~A~~ M.L.R. (Disposal of Govt. Lands) Rules, 1971; and

vii) that the grantee shall be liable for such penalty, as ~~may~~ has been prescribed under the M.L.R. Code 1966, and rules thereunder for breach of any of the conditions.

5.5.79.

Sd. 13/5/78
Collr. Jal.
9.5.79

To
1 The President,
M.C. Raver.
2 Copy with the case Pps. to the Tal. Raver for further n.a.

(५९)

वाचले : - १) चेअरमन,लोकशिक्षण मंडळ, रोझोदे ता. रावेर जिल्हा जळगांव यांचा दिनांक २८/३/९४ चा अर्ज.

२) तहसीलदार यावल यांचे कडील पत्र व्यवहार क्र. जमीन/१/२०००/ ४१९७/ १०४६ दि.२५/१०/२००.

३) सहाय्यक संचालक नगर रचना यांचे कडील पत्र व्यवहार क्र. मुल्यनिर्धारण/ मौजे रोझोदे-रावेर/ग.नं १ ससंजळ/२७/दि. १२/३/९७.

४) शासन महसुल व वन विभाग यांचे कडील परिपत्रक क्र.एलआरएस /१०८३/ ७११/१३४/सीआर/३४७८/जे -६ दि. ८/२/८३

५) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीचे वितरण) नियम १९७१ चे नियम ५,६,व७

६) कार्यकारी अभियंता जळगांव पाटबंधारे विभाग जळगांव यांचे पत्र क्र.जपावि/ प्रशा/२/२९१७/२००१ दिनांक ११/९/२००१

--- ००० ---

क्रमांक/जमीन/२/२६
एसआर/८९ /२००१
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय
जळगांव दिनांक ३०/ ११ /२००१

## आदेश

चेअरमन,लोकशिक्षण मंडळ, रोझोदे ता. रावेर जिल्हा जळगांव यांनी शाळेच्या क्रिडांगणासाठी मौजे रोझोदे तालुका रावेर गट नं. १ पैकी ०.४० ची मागणी उपोदघातातील अनुक्रमांक (१) अन्वये केली आहे.

सदर अर्जाची चौकशी केली असता खालील बाबी निष्पन्न झालेल्या आहेत.

१) सदरहू संस्था, संस्था नोदणी अधिनियम १९६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम १९५० अन्वये नोदणीकृत आहे.

२) सदरहू संस्थेस शिक्षण उपसंचालक नाशिक यांचे पत्रक शिउस/माध्य २/प्रशा/७३६६/७८/८७-८८ दिनांक १०/८/८८ मान्यता मिळाली आहे.

३) सदरहू संस्थेस अनुदान तत्वावर मान्यता मिळाली असल्याचे शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.जळगांव यांनी त्यांचे पत्र क्र.शिक्षण/एस-८/९३-९४/९९३ दिनांक ८/९/९३ अन्वये कळविले आहे.

४) सरपंच ग्रामपंचायत रोझोदे तालुका रावेर यांनी उपरोक्त जागा वितरणास त्यांचे कडील ठराव क्र. ४(१) दिनांक २४/११/१९९५ अन्वये नाहरकत नोंदविली आहे.

५) सहाय्यक संचालक नगर रचना जळगांव यांनी उपोदघातातील अनुक्रमांक (३) अन्वये उपरोक्त जागा वितरणास शिफारस केली आहे. व मुल्यांकन कळविले आहे.

६) तहसीलदार रावेर यांनी उपोदघातातील अनुक्रमांक (२) अन्वये उपरोक्त जागा वितरणास शिफारस केली आहे.

७) कार्यकारी अभियंता जळगांव पाटबंधारे विभाग जळगांव यांनी उपोदघातातील अनुक्रमांक (६) अन्वये उपरोक्त जागा वितरणास शिफारस केली आहे.

उपरोक्त चौकशी अंती निष्पन्न झालेल्या बाबी वरुन उपोदघातातील अनुक्रमांक (५) अन्वये प्रदान केलेल्या शक्ती नुसार उपरोक्त मागणी केलेली जागा चेअरमन,लोकशिक्षण मंडळ, रोझोदे ता. रावेर जिल्हा जळगांव यांना मौजे रोझोदे तालुका रावेर गट नं. १ पैकी ०.४० आर ची जागा नकाशात दर्शविल्या प्रमाणे शाळेच्या

क्रिडांगणासाठी भोगाधिकार मुल्यरहीत व महसुल मुक्त किंमतीवर नाम मात्र एक रूपया किंमतीवर पंधरा वर्ष मुदती पर्यन्त भाडे पट्याने खालील शर्ती, व अटीवर बंधनकारक ठेवून वितरीत करीत आहे.

शर्ती व अटी

१) ज्या प्रयोजनासाठी जागा वितरित करण्यांत आली आहे, त्याच प्रयोजनासाठी जागेचा वापर करावा. मा.जिल्हाधिकारी यांचे पूर्व परवानगी शिवाय अन्य प्रयोजनासाठी जागेचा उपयोग करता कामा नये. शाळेच्या क्रिडांगणासाठी मंजूर केलेली जागा संस्थेस भोगवटदार वर्ग २ म्हणून धारण करील.

२) मंजूरी दिनांकापासून दोन वर्षाचे आंत जमीन ज्या प्रयोजनासाठी दिली, त्याबाबतीत सिध्द ठेवली पाहीजे व जागेचा वापर केला पाहीजे.

३) बांधकाम नकाशे सक्षम प्राधिका-याकडून मंजूर करूनच बांधकाम करावे.

४) उक्त जमीन किंवा तिच्यावर बांधलेली कोणतीही इमारत कोणत्याहीवेळी जिल्हाधिकारी यांच्या स्पष्ट अनुमती शिवाय ज्या करीता जमीन मंजूर केली असेल ते प्रयोजन सोडून किंवा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी तात्पूरती किंवा कायम वापरता येणार नाही, आणि अशा प्रयोजनांत कोणताही बदल किंवा फेरफार करण्यांत येणार नाही, किंवा त्यावर उभारलेली कोणतीही इमारत मंजूरी दिलेल्या व्यक्तीस/संस्थेस नफा होईल अशा प्रकारे वापरता येणार नाही.

५) शाळा आणि त्याअनुषंगाने कार्यक्रम जात,पंथ,किंवा धर्म लक्षात न घेता सर्वांना खुले ठेवण्यांत येईल.

६) जमीनीच्या वापरास अनधिकृत परिवर्तनाबद्दल किंवा फेरफार करण्यांस आला असल्यास उक्त जमीन किंवा तिच्या उभारण्यांत आलेल्या कोणत्याही इमारतीमुळे मंजूरी दिलेल्या व्यक्तीस, संस्थेस नफा मिळत असल्यास उक्त जमीन महसूल संहीता १९६६ चे कलम ६७ अन्वये ती पात्र असलेल्या आकारणी शिवाय शेतीच्या प्रयोजनासाठी आकारणी करण्यांत आलेल्या उक्त जमीनीच्या कृषिदृष्ट्या अनुज्ञेय नसलेल्या अशा कोणत्याही प्रयोजनासाठी अनधिकृत वापर करण्यांत आला असे समजून उक्त संहीतेच्या कलम ४५ च्या तरतुदीनुसार किंवा जमीन महसूलाच्या वसूली बाबत त्या त्यावेळी अंमलात असलेल्या तरतुदीनुसार जिल्हाधिकारी निश्चित करतील अशा दंडास पात्र राहील.

७) वरील शर्त क्र.६ अन्वये करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाध येवू न देता १ ते ६ यातील कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास किंवा ती जमीन कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी असे घोषणा पत्र मंजूरी दिलेल्या व्यक्ती आणि राज्यसरकार यांचा निर्णय ठरेल किंवा भूमी संपादन अधिनियम १८८४ अन्वये राज्यसरकारने संपादनासाठी उक्त जमीन अधिसूचित केल्यास उक्त भूधारक किंवा व्यवस्थापकास सहा महीन्याची लेखी नोटीस देवून सरकारने पूढे दिलेल्या २ भागापेकी एकाचा अवलंब करणे कायदेशीर राहील:-

अ) राज्य शासनाच्या पूर्व मान्यते शिवाय जमीन किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिच्यातील कोणताही हितसंबध हस्तांतरीत करता येणार नाही.

ब) शर्त (अ) चा भंग केल्याबद्दल जिल्हाधिकारी या बाबतील निश्चित करतील अशा तारखे पर्यन्त ज्या विशिष्ट प्रयोजनासाठी किंवा प्रयोजनासाठी जमीन देण्यांत आली असेल त्या प्रयोजनासाठी उक्त जमीन वापरण्यांत आली नाही तर, किंवा ज्या प्रयोजनासाठी देण्यात आली ते विशिष्ट प्रयोजन किंवा प्रयोजना व्यतिरिक्त इतर राज्य शासनाच्या स्वतःच्या प्रयोजनासाठी किंवा अन्य कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठीही आवश्यक वाटत असल्यास उक्त जमीन तिच्यावर बांधण्यांत आलेल्या वास्तु व बांधकाम या सह, राज्य शासनास,जिल्हाधिकारी यांना परत घेता येईल व त्यांचा निर्णय अंतिम राहील. व त्या विरुध्द अपिल करता येणार नाही.उक्त जमीन अशा प्रकारे आवश्यक असल्याबद्दलचे जिल्हाधिका-यांचे सहीचे प्रतिज्ञापन हे प्रतिग्रहित व राज्य शासन यांच्यांत निर्णय असेल.

८) क्रिडांगणासाठी दिलेली जमीन १५ वर्षासाठी भाडे पटटाने दिलेली आहे. उक्त नाम मात्र भाडे रु.१/-(एक मात्र ) प्रतिवर्षी शासनास द्यावयाचा आहे. त्यानंतर भाडेपटयाची मुदत वेळोवेळी मदतीचे आंत वाढवून घेणेची जबाबदारी अर्जदार/ संस्था यांची राहील, व मुदत वाढविणे,किंवा नाकारणे या बाबतचा अंतिम अधिकार जिल्हाधिकारी यांचा राहील. उक्त मंजूर करण्यांत आलेल्या जागेच्या अनुषंगाने न्यायप्रविष्ट बाब,अथवा कोणत्याही प्रकारची हरकत आढळून आल्यास,उक्त मंजूर जागा रद्द करणेस पात्र राहील,व त्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मागता येणार नाही.व सदर बाब न्याय प्रविष्ठ करता येणार नाही.

९) महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीची विल्हेवाट ) नियम १९७१ च्या नियम ६(२) मधील तरतुदी प्रमाणे फार्म नं. १ मध्ये अर्जदारास/संस्थेस करुन द्यावी लागेल.

१०)भाडे पटयाची मुदत वाढवून घेण्याची आवश्यकता भासल्यास भाडेपटयाची मुदत संपण्याआधी किमान एक वर्ष आधि अर्ज करणे आवश्यक असेल.

११)अर्जदाराने, संस्थेने जागेचा वापर सुरु केल्यानंतर जर काही क्षेत्र अर्जदाराने, संस्थेने वापरात आणले नाही असे निदर्शनास आल्यास तेवढे क्षेत्र केव्हांही सरकार जमा करुन घेण्यात येईल.

स्वाक्षरीत/-
(डॉ. संजय मुखर्जी)
जिल्हाधिकारी जळगांव

प्रत :- चेअरमन,लोकशिक्षण मंडळ, रोझोदे ता. रावेर जिल्हा जळगांव
प्रत :- तालुका निरिक्षक भूमी अभिलेख रावेर
प्रत :-उपविभागिय अधिकारी भुसावळ,विभाग भुसावळ.
प्रत :-सहाय्यर संचालक नगर रचना,जळगांव
प्रत :-तहसीलदार रावेर

२/- सोबत संचितम मुळकागदपत्र पानांक १ ते २२७ पाठविली आहेत.
उपरोक्त सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत अर्जदार/संस्था यांचे प्रथम कडून रु. २०/-चे स्टॅंपवर संमतीपत्रक तयार करुन घ्यावे, त्याची मुळ प्रत दप्तरी ठेवून त्याची छायांकित प्रत व दुरुस्त ७/१२, उतारा,नोंदी या कार्यलयास सादर करावेत.

जादा प्रत

जिल्हाधिकारी जळगांव करीता

जिल्हाधिकारी जळगांव

वाचले – १) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ३८

२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण योजना मंडळ नाशिक यांचे पत्र क्रमांक मजीप्रामं/भानिकना/ताशा/४२५०/२०११, दि ३१/१२/२०११

३) उपसंचालक भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा नाशिक विभाग नाशिक यांचे पत्र क्र उपसं/भूसविय/ना/नपापुदा/ता २५०७/२०१,दि १४/१२/२०११

४) कार्यकारी अभियंता ग्रामीण पुरवठा विभाग जि.प.जळगांव यांचे पत्र क्र ग्रापापुवि/ तां.शा.२/१०४/२०१२ दि २१/४/२०१२

५) सह जिल्हा निंबधक वर्ग-१ जळगांव यांचे पत्र क्र कक्ष-७/मुल्याकन/२०१२/११७६/१२ दि ११/४/२०१२

६) तहसिल्दार रावेर यांचे पत्र क्र जमीन/कावि/२५५/२०१२ दि २२/३/२०१२

७) ग्रामपंचायत खिरोदा प्र.यावल ता रावेर यांचा दि २६/१/२०१२ चा ठराव क्र ६

८) अध्यक्ष ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती खिरोदा प्र.यावल ता.रावेर यांचे पत्र क्र ९२ दि ८/२/२०१२

---

क्र /जमीन-३/२८/कावि/८८०/२०१२
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
जळगांव दिनांकः- १०/०५/२०१२

**आदेश**

अध्यक्ष, ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती खिरोदा प्र.यावल ता.रावेर यांनी उपोदघातातील अनु.क्र ८ मधील पत्राव्दारे खिरोदा प्र.यावल ता.रावेर गांवी राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमामध्ये पाणी पुरवठा योजना मंजूर झाली असून या योजनेचा स्त्रोत सुकी नदीच्या उजव्या काठावर लोहारा गट क्र ३७६ मध्ये असल्याबाबत भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा नाशिक विभाग नाशिक यांनी जागा निश्चित केली आहेत. .त्यांनी लोहारा गट नं. ३७६ क्षेत्र ५ हेक्टर १२ आर पैकी ०.०१ आर जागा ३ ट्युबवेल खोदण्यासाठी मिळणेबाबत विनंती केली आहे.

ग्रामपंचायत खिरोदा प्र.यावल ता.रावेर यांनी उपोदघातातील अनु.क्र ७ वरील ठरावाव्दारे लोहारा गट क्र ३७६ पैकी ०.०१ आर जागा मागणी बाबतचा प्रस्ताव तहसिलदार रावेर यांचेकडे पाठविणेबाबत ठराव पारीत केला आहे.

अधिक्षक अभियंता नागरी व ग्रामीण योजना मंडळ नाशिक यांनी उपोदघातातील अनु.क्र २ वरील पत्राव्दारे खिरोदा प्र. यावल ता.रावेर येथील पाणी पुरवठा योजनेच्या अंदाजपत्रके व आराखडयास मंजूरी दिली आहे.

उपसंचालक भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा नाशिक विभाग नाशिक यांनी उपोदघातातील अनु.क्र ३ वरील पत्राव्दारे खिरोदा प्र.यावल ता.रावेर गांवाच्या परिसरात दि ८/१२/२०१११ रोजी भूजल शास्त्रीय सर्व्हेक्षण केले असता ३ किलो मीटर परिसरात भूशास्त्रीय परिस्थितीचा विचार करता अस्तीवात असलेल्या उद्भवातून प्रकल्पित लोकसंख्येस पुरेसे पाणी भुगर्भातुन मिळणे शक्य नाही. .त्यामुळे लोहारा गट नं ३७६ पैकी ०.०१ आर मध्ये प्रत्येकी ६० मीटर खोलीच्या ३ नलिकाकुप घेण्यांची शिफारस केली आहेत.

कार्यकारी अभियंता ग्रामीण पुरवठा विभाग जि.प.जळगांव यांनी उपोदघातातील अनु.क्र ४ अन्वये लोहारा गट नं. ३७६ मध्ये ०.०१ आर जागेमध्ये ३ ट्युबवेल जागा संपादीत होण्यांस शिफारस

केली आहे. याकामी ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती खिरोदा प्र यावल ता.रावेर जागेची किंमत भरणा करण्यांस तयार असल्याबाबत म्हटले आहे.

ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती खिरोदा प्र यावल ता रावेर यांनी दि २/५/२०१२ च्या प्रतिज्ञापत्रात लोहारा गट नं ३७६ पेकी ०.०१ आर जागेत ३ ट्युबवेल खोदण्याची परवानगी मिळाल्यास भविष्यात लोहारा गांवात पाण्याची टंचाई निर्माण झाल्यास सदर ट्युबवेलचे पाणी लोहारा गावांसाठी उपलब्ध करुन देवू व त्यांत कोणतीही अडचण निर्माण होणार नाही असे नमूद केले आहे. तसेच दि ७/३२०१२ च्या जबाबात जागेची नियमाप्रमाणे किंमत भरण्यांस तयार असल्याचे नमूद केले आहे.

तहसिलदार रावेर यांनी उपोद्घातातील अनु.क्र ६ वरील पत्राव्दारे खिरोदा प्र.यावल ता रावेर येथील राष्ट्रीय पेयजल अंतर्गत सार्वजनिक पाणी पुरवठा योजनेकामी मौजे लोहारा ता. रावेर ग.नं ३७६ पैकी ०.०१ आर जागा शासनाच्या नियमाप्रमाणे कब्जाहक्क रक्कम भरुन घेवून देण्यांस हरकत नसल्याबाबत शिफारस केली आहे.

सह जिल्हा निंबधक वर्ग १ जळगांव यांनी उपोदघातातील अनु.क्र ५ अन्वये लोहारा ता रावेर गट नं. ३७६ पैकी ०.०१ आर जागेचे सन २०१२ चे मुल्यांकन २४,०००/- निश्चित केले आहे.

खिरोदा प्र यावल ता रावेर येथे राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम अंतर्गत पाणी पुरवठा योजना मंजूर झाली असून उपसंचालक भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा नाशिक विभाग नाशिक यांच्या अहवालानुसार खिरोदा प्र.यावल ता.रावेर येथे ३ किलो मीटर परिसरात भूशास्त्रीय परिस्थितीचा विचार करता आरक्षीत असलेल्या उद्भवातून प्रकल्पित लोकसंख्येस पुरेसे पाणी भुगर्भातुन मिळणे शक्य नसल्याने मी, जिल्हाधिकारी,जळगांव या आदेशाव्दारे अध्यक्ष ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती खिरोदा प्र यावल ता.रावेर यांना लोहारा ता रावेर गट नं.३७६ क्षेत्र ५ हे १२ पैकी ०.०१ आर जागा पाणी पुरवठा योजनेसाठी रक्कम रुपये २४,०००/- कब्जाहक्क रकमेवर खालील अटी व शर्तीस अधिन राहून मंजूर करीत आहेत.

**<u>अटी व शर्ती</u>**

१. सदरची जमीन भोगवटा वर्ग २ म्हणून धारण करावी लागेल.

२. लोहारा ता रावेर येथे भविष्यांत पाणी टंचाई उदभवल्यास अध्यक्ष ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती खिरोदा प्रयावल ता.रावेर यांनी दिनांक २/५/२०१२ च्या प्रतिज्ञापत्रानुसार सदर ट्युबवेलचे पाणी उपलब्ध करुन द्यावे लागेल त्याबाबत कोणतेही अडचण करता कामा नये.

३. जागेचा वापर विहीरीसाठी करावा.

४ . मंजुर केलेल्या जागेपेक्षा जास्त जागेचा वापर करु नये.

५. अर्जदारास विहीत नमुन्यांत करारनामा करुन द्यावा लागेल.

६. लगत शेतमालकाचे जमिनीतून पाईपलाईन टाकणे कामी तहसिलदार यांचेकडून स्वतंत्रपणे परवानगी घेणे आवश्यक आहे.

७. पाणीपुरवठा योजनेस दिलेल्या जागेची शासनास आवश्यकता पडल्यास ती जागा व केलेल्या बांधकामाबद्दल व खर्चाबद्दल कोणतीही भरपाई न देता १ महिनापुर्वी नोटीस देवून सरकार जमा

करण्याचा जिल्हाधिकारी यांना अधिकार असेल.

८. शासनाचे परिपत्रक क्र. संकिर्ण ०५/२००६/प्र.क्र.४६/ज-१/ दि. ३१.१०.२००६ अन्वये विहीत नमुन्यांतील करारनामा दस्त मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ नुसार निष्पादित करणे बंधनकारक आहे.

९. अर्जदार यांनी वरील पैकी कोणत्याहि अटी/शर्तीचा भंग केल्यास कोणतीही नुकसान भरपाई न देता जमिन विहीरीसह शासनजमा करणेत येईल..

(ज्ञा.स.राजुरकर) १०.५.१२
जिल्हाधिकारी जळगांव

१०.५ १०-५

प्रत :- अध्यक्ष ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती खिरोदा प्र.यावल ता.रावेर
प्रत :- तहसिलदार रावेर
२/- अध्यक्ष ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती खिरोदा प्रयावल ता.रावेर यांचेकडुन लोहारा ता.रावेर गट नं.३७६ पै.०.०१ आर जागेची कब्जा हक्क रक्कम २४,०००/- भरुन घेऊन मुळ चलन या कार्यालयास सादर करावे
प्रत :- कार्यकारी अभियंता ग्रामीण पुरवठा विभाग जि.प.जळगांव
प्रत :- उपसंचालक भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा नाशिक विभाग नाशिक
प्रत :- अधिक्षक अभियंता नागरी व ग्रामीण योजना मंडळ नाशिक
प्रत :- तलाठी लोहारा तालुका रावेर
२/- गट नं.३७६ ची ७/१२ उता-यात इतर हक्कात अध्यक्ष ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती खिरोदा प्रयावल ता.रावेर यांना ०.०१ आर पाणी पुरवठा योजनेसाठी देणेबाबत नोंद घ्यावी.
प्रत :- निवडनस्ती

१०-५
जिल्हाधिकारी जळगांव करिता

१०.५

वाचले : १) कार्यकारी अभियंता (स्थापत्य) धुळे, म.रा. वि. मंडळ यांचा जागा मागणी बाबतचा प्रस्ताव
२) शासन, महसूल व वनविभागाकडील शासन क्र. जमिन-३२९१/१७७३५/प्र.क्र.१३६०/ ज-६, दि. १८-२-१९९२.

---

क्रमांक जमिन-८८१/१११५
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय
जळगांव, दि. ८-३-१९९४

आदेश

कार्यकारी अभियंता, (स्थापत्य) महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ धुळे यांनी विवरखुर्द ता. रावेर येथील स.नं. ६९८ पैकी १-०२ आर जागा ३३/११ के.व्हि. क्षमतेचे विद्युत उपकेंद्र उभारणेसाठी मिळणे बाबत विनंती केली आहे.

शासन, महसूल व वनविभागाकडील शासन क्र. जमिन-३२९१/१७७३५/प्र.क्र.१३६०/ज-६, दि. १८-२-१९९२ अन्वये मौजे विवरखुर्द ता. रावेर येथील स.नं. ६९८ मधील १-०२ जमिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळास ३३/११ के.व्हि. क्षमतेचे विद्युत उपकेंद्र उभारणेसाठी म.ज.म. (सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम ३१ अन्वये रु. ८६,७००/- इतकी क.इ. रक्कम आकारून मंडळास [illegible] ताबा दिल्याचे दिनांकापासून रकमेचा भरणा होईपर्यंत कब्जेहक्क रकमेच्या ८ % दराने व्याज आकारून जागा वितरणास मंजूरी दिली आहे.

कार्यकारी अभियंता (स्थापत्य) धुळे यांनी कब्जेहक्क रक्कम ८६,७००/- व ८ % दराने व्याजाची रक्कम रु. ६९३५/- असे एकूण रक्कम रु. ९३,६३५/- मा. चलन क्र. ११, दि. २९-९-९२ अन्वये चलनाने सरकार जमा केली आहे.

कार्यकारी अभियंता यांनी दिनांक ५-६-९२ पर्यंत ८ % दराने व्याजाची रक्कम भरल्याने त्यांचेकडून दि. ६-६-९२ ते ३०-९-९२ [illegible]

१-८-९२ ते २९-९-९२ पर्यंत १५ %. दराने रु. ३९५१-०० नजराणा रक्कम रु. ३५०/- चलनाने सरकार जमा केली आहे.

मी, जिल्हाधिकारी जळगांव या आदेशाद्वारे महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम ३१ नुसार कार्यकारी अभियंता, म.रा.वि. मंडळ यांना मौजे विवरे बु. ता. रावेर येथील गट नं. ४९८ पैकी १-०२ हेक्टर आर इतकी जमीन ३३/११ के.व्ही. क्षमतेचे विद्युत उपकेंद्र उभारणेसाठी खालील अटी व शर्तीवर वितरण करीत आहे.

अटी व शर्ती

१) जमिनीच्या स्थितीच्या आधारावर जमिनीचे मुल्यनिश्चन करण्यात आले आहे. जमीन देण्यात येत आहे त्या त्याचे त्या जमिनीच्या विकास सोयी आवश्यक असलेल्या इतर गोष्टी कामाने देणाऱ्या लागतील.

२) जमीन देणार, जमीन ताब्यात घेतल्याच्या तारखेपासून दोन वर्षाच्या कालावधीत ज्या प्रयोजनासाठी ती देण्यात आली आहे त्या प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करतील.

३) जमीन घेणारा हा भोगवटादार वर्ग-२ म्हणून व अहस्तांतरणीय शर्तीवर जमीन धारण करतील.

४) जमीन देणार हा वेळोवेळी ठरविण्यात येईल त्या प्रमाणे दर ठरविण्यात आकारण्यात येणारा अकृषिक आकारणीची रक्कम नियमितपणे देईल.

-२-

५] जमिनीवरील सर्व खाणी व खनिज पदार्थ तसेच दगडखाणी यावरील शासनाने राखून ठेवलेल्या अधिकारास अधिन राहून जमिन देण्यात येईल आणि शासनाला खाणकाम करण्याचा व उक्त द्रव्ये शोधण्याच्या प्रयोजनार्थ महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे त्याठिकाणी प्रवेश करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य असेल.

६] महाराष्ट्र जमीन महसूल[सरकारी जमीनीची विल्हेवाट लावणे]नियम १९७१ याच्या नियम ३१ व ४१ मध्ये घालुन दिलेल्या शर्तीस अधिन राहून जमीन देण्यात आली आहे.

७]जर जमीनीची किंवा तिच्या कोणत्याही भागाची कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी भविष्यकाळात ती शासनाला आवश्यकता भासेल तर ती जमीन परत घेण्यात येणार असेल त्या ~~प्रकरण~~ जमीनीसाठी किंवा तिच्या अशा कोणत्याही भागासाठी जमीन घेणाऱ्याने जमीनीच्या किंमतीएवढी भरपाई दिल्यानंतर आणि जमीनीवर कोणतेही बांधकाम असल्यास कार्यकारीअभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी निर्धारित केलेला इमारतीचा व बांधकामाचा खर्च दिल्यानंतर शासनाकडून जमीन परत घेण्यात येईल.

८] जमिनीचा ताबा मिळाल्याच्या तारखेपासुन किंवा हा आदेश काढण्यात आलेल्या तारखेपासुन दोन वर्षांच्या कालावधीच्या आत जमीन घेणारा याअन्वये देण्यात आलेल्या जमीनीवर दर १०० चौ.मीटर जमीनीवर १ झाड याप्रमाणे योग्य जातीची झाडे लावील आणि त्याचे नेहमी करिता परिरक्षण करील.

९] वर नमुद केलेल्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ याचे उपबंध आणि तदन्वये करण्यात आलेल नियम लक्षात घेवुन कोणत्याही शर्तीचे उल्लंघन केल्यास जमीनीचे प्रदान रद्द करण्यात येईल आणि कोणतीही भरपाई न देता शासन ती जमीन आपल्याकडे परत घेईल.

१०] जमिन घेणारा महाराष्ट्र जमीन महसूल[सरकारी जमीनीची विल्हेवाट लावणे नियम १९७१ यातील नियम ४२ अन्वये विहीत केलेल्या संबंधीत नमुन्यात वरील अटी व शर्ती संविनिर्दिष्ट करणारा व त्यांना मान्यता देणारा करारनामा करुन देईल.

जिल्हाधिकारी जळगांव

प्रत- ~~कार्यकारी अभियंता (बांधकाम)~~ [illegible]
प्रत- ~~तहसिलदार रावेर~~

२/- अर्जदाराने जागेची किंमत रक्कम रूपये ९७,२३२ दिनांक ——— रोजी भरली असल्याने जागेचा ताबा देवुन गावचे दप्तरी योग्य त्या नोंदी घ्याव्यात.

प्रत- जिल्हा निरिक्षक भूमी अभिलेख जळगांव यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी

प्रत- सरपंच,ग्रामपंचायत ~~विवरे खुर्द~~ तालुका ~~रावेर~~

जिल्हाधिकारी जळगांवकरिता

वाचले :-1) म.अधिक्षक अभियंता म.रा.वि.मं नाशिक यांचेकडील प्रस्ताव प.क्र. SEC/CCMC/NSK/Tech/LA-17/1608 दि.27 ऑगस्ट.2004
2) शासन महसूल व वनविभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील परिपत्रक क्रमांक जमीन/10/2005/प्र.क्र.38/ज-1/दि.7.3.2006
3) सहाय्यक संचालक नगररचना विभाग,जळगांव यांचेकडील पत्र क्रमांक जागा मागणी/ससं-जळ/मौजे सिंगत/ग.न.20/1/181/दि.29 जानेवारी,2005
4) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 चे कलम 51(1) अ
5) सह जिल्हा निबंधक वर्ग-1,जळगांव यांचेकडील पत्र क्रमांक/मुल्यांकन/कक्ष-1 कावि/प्र.क्र.679/06 दि.7.2.2007

--- 000 ---

क्रमांक/जमीन/3/28/कावि/१३२०/२००७
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय
जळगांव **दिनांक :-** ६/१/२००७

## आदेश

म.अधिक्षक अभियंता पुर्वीचे म.रा.वि.मंडळ,नाशिक आताचे विद्युत वितरण कंपनी यांनी नवीन 33/11 के.व्ही उपकेंद्र बांधकामासाठी मौजे सिंगत तालुका रावेर येथील गट नं.20/1 मधून 8000 चौ.मि.व गट नं.19/1 मधून 12 मीटर रस्त्यांसाठी जागा वर्ग करणेची विनंती या कार्यालयास केलेली आहे.

विषयांकित प्रकरणात तहसिलदार, रावेर,सहाय्यक संचालक नगररचना ,जळगांव, सह जिल्हा निबंधक वर्ग-1 जळगांव यांचेकडून अहवाल मागविण्यांत आले असून त्यांनी सदर जागा विद्युत वितरण कंपनीस 33/11 के.व्ही उपकेंद्र बांधकामासाठी देणेबाबत शिफारस केलेली आहे.तसेच ग्रामपंचायत सिंगत ता.रावेर यांनी प्रश्नाधिन गट नं. 20/1 मधून 8000 चौ.मि. व गट नं.19/1 मधून 12 मीटर जमीन देण्यांबाबत नाहरकत ठराव मंजूर केलेला आहे.

विद्युत मंडळाने मागणी केलेली प्रश्नाधिन जमीन ही ग्रामपंचायत निहीत असल्याने ती ग्रामपंचायतीकडून काढून सरकार कडे वर्ग करणे आवश्यक असल्याने मुंबई ग्रामपंचायत अधिनियम,१९५८ यातील कलम ५१ (१) (अ) चे प्राप्त अधिकारान्वये मी.जिल्हाधिकारी, जळगांव शासनाचे वरील अ.क्र.२ मध्ये नमूद केलेल्या परिपत्रकान्वये मौजे सिंगत ता.रावेर येथील ग्रामपंचायत निहीत गट नं. 20/1 मधून 8000 चौ.मि. व गट नं.19/1 मधून 12 मीटर (रस्त्यांसाठी) ग्रामपंचायत सिंगत कडून काढून सरकार कडे या आदेशान्वये वर्ग करित आहे.

तसेच शासन महसूल व वनविभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील परिपत्रक क्रमांक जमीन/१०/२००५/प्र.क्र.३८/ज-१/दि.७.३.२००६ मधील तरतूदीनूसार प्रश्नाधिन जमिन ग. नं. २०/१ मधून ८००० चौ.मि. व गट नं.१९/१ मधून १२ मीटर (रस्त्यासाठी) जागेचा आगाऊ ताबा खालील शर्तीवर देण्याचे आदेश याव्दारे देत आहे.

**आदेश**

१) सदरची जागा धारक नवीन अविभाज्य शर्तीवर (भोगवटदार वर्ग २) धारण करील.
२) शासन जागेबाबत जे भोगाधिकार मुल्यनिश्चित करेल ती रक्कम व जमीनीचा आगाऊ ताबा घेतल्याच्या दिनांकापासून भोगाधिकार मुल्यांच्या रकमेचा भरणा व्याजासह भरणेस

तयार असलेबाबत तसेच शासन ज्या अटी व शर्तीवर जागा देईल.त्या मान्य असलेबाबत स्टॅपपेपरवर लेखी करारनामा तहसिलदार,रावेर यांचेकडेस करुन देईल.

३) जमीनीची विक्री,हस्तांतरण,गहाण ठेवणे, वापरात वदल करणे यास जिल्हाधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

४) जमीन घेणारा वेळोवेळी ठरविण्यांत येईल त्याप्रमाणे नियमित अकृषिक सारा भरणा करील.

५) जमीनीवरील सर्व खाणी व खनीज पदार्थ यावरील शासनाने राखून ठेवलेल्या अधिकारास अधिन राहून जमिन देण्यांत आलेली आहे. सदर जमिनीवर शासनाचा खाणकाम करण्याचा उक्त द्रव्य शोधण्याचा पूर्ण अधिकार राहील.

६) शासनाचे दि. ३१ ऑक्टोबर,२००६ चे परिपत्रकानुसार सदर जागेचा करारनामा दस्त मुंबई मुंद्राक अधिनियम,१९५८ नुसार निष्पादित करुन द्यावा लागेल.

७) वरील पैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास जमीन सरकार जमा करण्यांत येईल.

o/c

( विजय सिंघल)
जिल्हाधिकारी जळगांव

प्रत :-मा.प्रधान सचिव महसूल व वनविभाग मंत्रालय,मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर
प्रत :-मा.विभागीय आयुक्त,नाशिक विभाग नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर
प्रत :- उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य) खांब कारखाना,जळगांव
2/- आपण प्रस्तावित जागेचा आगाऊ ताबा तहसिलदार,रावेर यांचेकडून घ्यावा. व आदेशातील शर्ती मान्य असलेबाबत लेखी करारनामा तहसिलदार रावेर यांचेकडेस करुन द्यावा.
प्रत :-तहसिलदार रावेर
2/-उपकार्यकारी अभियंता (स्थापत्य) खांब कारखाना,जळगांव यांना जागेचा आगाऊ ताबा देणेपूर्वी आदेशातील अटी व शर्ती मान्य असलेबाबत तसेच लेखी करारनामा करुन घ्यावा.व अट क्रं.6 नुसार निष्पादित करारनामा करुन घ्यावा.त्यानंतर जागेचा आगाऊ ताबा देण्यांत यावा. व तसा अहवाल या कार्यालयास 7/12 उतारा-यांसह सादर करावा.
प्रत :- कार्यकारी अभियंता (स्थापत्य) विज वितरण कंपनी लिमीटेड,नाशिक
प्रत :- उप कार्यकारी अभियंता (स्थापत्य) खांब कारखाना,जळगांव
प्रत :- तालूका निरिक्षक भूमि अभिलेख,रावेर यांना माहिती व कार्यवाहीसाठी
प्रत :- उपविभागीय अधिकारी,भुसावळ भाग,भुसावळ
प्रत :- अधिक्षक भुमि अभिलेख,जळगांव यांना माहिती व कार्यवाहीसाठी
प्रत :- ग्रामपंचायत सिंगत ता.रावेर
प्रत :- सहाय्यक संचालक नगररचना,जळगांव

o/c जिल्हाधिकारी जळगांव करिता